**Secondary Education Society's**

# Arts and Science College, Bhalod

## Taluka-Yawal, Dist- Jalgaon 425304

**NAAC Reaccredited "B" Grade**

**E-mail: ascbhalod@gmail.com, Web: ascbhalod.ac.in. Ph.Office: +91-02585- 242229. Fax: +91-02585-242411**

## Personality Development Workshop


















दिव्यमराठी १९ जानेवारी २०१९

# व्यक्तिमत्व विकासासाठी आत्मविश्वास महत्त्वाचा घटक

### मोहिनी नेहेते यांचा भालोदमध्ये विद्यार्थिनींना सल्ला

**प्रतिनिधी** | भालोद

व्यक्तिमत्व विकास साधताना आत्मविश्वास हा एक महत्त्वाचा घटक ठरू शकतो. तुमचा आत्मविश्वास जेवढा बुलंद तेवढी तुमची वाटचाल सोपी व आनंददायी होते, असे लेखिका मोहिनी नेहेते यांनी सांगितले. भालोद येथील महाविद्यालयात युवती सभेने आयोजित विद्यार्थिनी व्यक्तिमत्व विकास शिबिरात 'मराठी साहित्यातून व्यक्तिमत्व विकास' या विषयावर त्या बोलत होत्या. चार सत्रात ही कार्यशाळा झाली.

जळगाव येथील कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आणि भालोद येथील कला व विज्ञान महाविद्यालयाच्या पुढाकाराने शुक्रवारी एकदिवसीय विद्यार्थिनी व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा पार पडली. सेकंडरी एज्युकेशन सोसायटीच्या व्हाइस चेअरमन हेमलता इंगळे अध्यक्षा, तर उद्घाटन प्रा.डॉ.जगतराव धनगर यांच्याहस्ते झाले. पहिल्या सत्रात मोहिनी नेहेते यांनी संवाद साधला. डॉ.पी. एम.चौधरी अध्यक्ष होते. दुसऱ्या सत्रात डॉ.जगतराव धनगर यांनी 'स्पर्धा परीक्षा व व्यक्तिमत्व विकास' या विषयावर संवाद साधला. अपयशाची भीती न बाळगू नका, असे ते म्हणाले. सत्राचे अध्यक्ष डॉ. दिनेश पाटील यांनीही संवाद साधला. तिसऱ्या सत्रात डॉ. सरस्वती रतकल्ले (खिरोदा) यांनी महिला सबलीकरणातून व्यक्तिमत्त्व विकासावर बोलताना सावित्रीबाईचा आदर्श समोर ठेवण्याचा सल्ला दिला. प्रा.डी.बी. चौधरी अध्यक्ष होते. सूत्रसंचालन मोनल जावळे व योगिता चौधरी, प्रास्ताविक प्रा. डॉ.वर्षा नेहेते, आभार डॉ. दिनेश पाटील यांनी मानले. शिबिराच्या यशस्वितेसाठी युवती सभा सदस्य डॉ.पी.एम.चौधरी, प्रा. डी.बी.चौधरी, डॉ.दिनेश पाटील, प्रा.एच.टी. इंगळे, डॉ.आशुतोष वर्डीकर, प्रा.राकेश चौधरी, डॉ.सुनील नेवे, तुळशीराम पाटील, मुबारक तडवी, पंकज नेहेते यांच्यासह प्राचार्य डॉ.अजय कोल्हे, उपप्राचार्य एम.टी. चौधरींनी सहकार्य केले.

### स्वयंरोजगारावर मार्गदर्शन

शेवटच्या सत्रात भुसावळच्या रोहिणी पाटील यांन स्वयंरोजगारातून व्यक्तिमत्व विकासावर हितगुज केले. डॉ. आशुतोष वर्डीकर सत्राचे अध्यक्ष होते. के.नारखेडे महाविद्यालय, पी.के.कोटेचा महिला कॉलेज (भुसावळ), डी.एन. कॉलेज (फैजपूर), यावल व भालोद महाविद्यालयातील प्रत्येकी १० अशा ५० विद्यार्थिनी शिबिरात सहभागी झाल्या होत्या.

---

लोकमत

# चार सत्रात झाली विद्यार्थीनी व्यक्तीमत्व विकास कार्यशाळा

### भालोद : ५० विद्यार्थिनींचा सहभाग

लोकमत न्यूज नेटवर्क

**भालोद, ता.यावल :** कवयित्री बहिणाबाई चौधरी उमवि व कला व विज्ञान महाविद्यालय भालोदतर्फे युवतीसभेअंतर्गत एकदिवशीय विद्यार्थिनी व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा से. ए. सोसायटीच्या व्हा. चेअरमन हेमलता इंगळे यांच्या अध्यक्षतेखाली झाली.

उद्घाटन प्रा. डॉ.जगतराव धनगर यांच्या हस्ते झाले. चार सत्रात कार्यशाळा झाली. लेखिका मोहिनी नेहेते, डॉ. धनगर, खिरोद्याच्या डॉ. सरस्वती रतकल्ले, रोहिणी पाटील यांनी मार्गदर्शन केले. ५० विद्यार्थिनी सहभागी झाल्या होत्या. सूत्रसंचलन मोनल जावळे व योगिता चौधरी यांनी केले. प्रास्ताविक प्रा. डॉ. वर्षा नेहेते यांनी तर आभार डॉ. दिनेश पाटील यांनी केले. डॉ. पी. एम. चौधरी, प्रा. डी.बी.चौधरी डॉ.दिनेश पाटील प्रा. एच टी. इंगळे, डॉ. आशुतोष वर्डीकर, प्रा. राकेश चौधरी, डॉ. सुनील नेवे, तुळशीराम पाटील, मुबारक तडवी, पंकज नेहेते यांनी परिश्रम घेतले.

Hello Bhusaval
Page No. 4 Jan 19, 2019
Powered by: erelego.com

# Swayamsiddha Abhiyan























# भालोद महाविद्यालयात स्वयंसिध्दा अभियान

■ भालोद, ता.यावल । वार्ताहर

भालोद येथील कला व विज्ञान महाविद्यालय येथे दि.१० ऑक्टोबर बुधवार रोजी स्वयंसिध्दा अभियानाचे उद्‌घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय कोल्हे यांचे शुभ हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आले. सदर स्वयंसिध्दा अभियान १० ऑक्टोबर ते १७ ऑक्टोबर अशा आठ दिवसाच्या कालावधीमध्ये रोज सकाळी दोन तास अशा प्रकारे आयोजीत करण्यात आले आहे. या अभियानात महाविद्यालयातील एकूण ५० विद्यार्थीनी सहभागी झाल्या आहेत.



अभियानाचे प्रशिक्षक म्हणून स्वयंसिध्दा राज्य प्रशिक्षक गोपाळ जोनवाल आणि विभागीय तज्ञ प्रशिक्षक प्रेमलता जोनवाल सहभागी विद्यार्थीनींनी स्वसंरक्षणाचे धडे देणार आहेत. गोपाळ जोनवाल यांनी मनोगतात स्पष्ट केले कि, स्त्री हे शक्तीचे रूप आहे. परंतू हीच स्त्री अनामिक भितीमुळे खचून जाते. आलेल्या अनपेक्षित संकटाशी चार हात करण्यासाठी स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण देणे हि विद्यार्थीनीसाठी महत्वपूर्ण गरज आज निर्माण झाली आहे. या प्रशिक्षणात ज्युडो कराटे, तलवार चालविणे, चाकूचा वार चुकविणे, हात सोडविणे, मिठी सोडविणे तसेच प्रसंगी जवळ असलेल्या सातिह्याच्या सहाय्याने मुकाबला कसा करावा यांचे प्रात्यक्षिके दिले जातील.

उद्‌घाटकीय मनोगतात प्राचार्य डॉ.अजय कोल्हे यांनी विद्यार्थीनींना संबोधित करतांना स्पष्ट केले कि, स्त्रियांच्या अंगी असलेल्या क्षमतांचा विकास झाल्यास त्या कोणत्याही अत्याचाराच्या बळी न पडता त्या यशस्वीपणे सामना करू शकतील. त्यासाठी स्वयंसिध्दा अभियानासारखे उपक्रम पूरक ठरू शकतात. अभियानामध्ये मनापासून सहभागी होण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थीनींना केले व शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्वयंसिध्दाच्या समन्वयक प्रा.सौ.वर्षा नेहेते यांनी केले. त्यात त्यांनी सदर अभियानाची रूपरेषा स्पष्ट केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.सोनल परतणे तर आभार प्रदर्शन डॉ.दिनेश पाटील यांनी केले. कार्यक्रमाच्या व अभियानाच्या यशस्वीतेसाठी युवती सभा सदस्य डॉ.प्रमोद चौधरी, डॉ.दिनेश पाटील, प्रा.डी.बी.चौधरी आदि परिश्रम घेत आहेत.

S E Society's Arts & Science College
Bhalod
Dist Jalgaon